महासमादेशकांचे कार्यालय, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील उपमहासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य <u>या अस्थायी पदास मुदतवाढ मिळणेबाबत.</u>

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक : एचजीएस-२०१८/प्र.क्र.०२/विशा-८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १८ मे, २०१८

<u>वाचा:-</u> १) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : पदनि-२०१६/प्र.क्र. ८/आ.पु.क., दिनांक ०५.३.२०१८

२) गृह विभाग, शासन निर्णय क्र. एचजीएस २०१८/प्र.क्र. ०२/ विशा-८,दि. २९.०१.२०१८

३) महासमादेशकांचे कार्यालय, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. मस/कार्या-२/अस्थायी/२०१८/१२१८, दिनांक ०२.०४.२०१८

<u>प्रस्तावना</u> :

महासमादेशकांचे कार्यालय, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील उपमहासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई या अस्थायी पदास संदर्भ क्र. २ अन्वये दि. २८.०२.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतवाढ दि. २८.०२.२०१८ रोजी संपली आहे. वित्त विभाग, शासन निर्णय, दि. ०५.०३.२०१८ अन्वये आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच, यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु ज्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१८ ते दि. ३०.०९.२०१८पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना देण्यात आले आहेत. तसेच दि. ३०.०९.२०१८ पूर्वी कोणत्याही परिस्थितीत कार्यालयांच्या आस्थापनेवरील मंजूर पदांचा आढावा घेऊन, सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. या अटीच्या अधीन राहून महासमादेशकांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयातील उपमहासमादेशक, होमगार्ड या अस्थायी पदास दिनांक ०१.०३.२०१८ ते दि. ३०.०९.२०१८पर्यंत पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब विचाराधीन होती. त्यास अनसरुन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

महासमादेशकांचे कार्यालय, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयातील उपमहासमादेशक, होमगार्ड या अस्थायी पदास दि. ०१.०३.२०१८ ते दि. ३०.०९.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

दि. ३०.०९.२०१८ पूर्वी सुधारीत आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने सुधारीत आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनास तात्काळ सादर करण्याची दक्षता महासमादेशकाचे कार्यालय, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाने घ्यावी.

२. या पदांवर होणारा खर्च २०७०-इतर प्रशासनिक सेवा, (१०७) होमगार्ड" ०१ या लेखाशिर्षाखाली वर्ग करण्यात यावा व सदरचा खर्च वित्तीय वर्षासाठी मंजूर अर्थसंकल्पिय अनुदानातुन भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभाग क्रः पदनि-२०१६/प्र.क्र. ८/१६ आ.पु.क., दिनांक ०५.०३.२०१८ अन्वये अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यांचा संकेताक क्र. २०१८०५१८१६०६४०७७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Deepak Vasant Sawant

Digitally signed by Deepak Vasant Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=43cdfecb6fd26ff7b1b970520962ebf72d86546b92151214820b2bb31f3ccac8, serialNumber=66ea8e25496abe127ddbfd3157e10ae5a1fb12e738b63f8a5b2cb92885fd1f05, cn=Deepak Vasant Sawant
Date: 2018.05.18 16:08:03 +05'30'

(दि. व. सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महासमादेशक होमगार्ड, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६) वित्त विभाग (व्यय-८)/वित्तीय सुधारणा-१, मंत्रालय,मुंबई.
७) निवड नस्ती, विशा-८ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.